सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

डॉ. प्रभाकर देसाई

एम्.ए., पीएच्.डी.

संचालक

कार्यालय क्र. : ०२०-२५६९७३४१

०२०-२५६२२६८८/८९

मोबाईल : ९८८१९०८०२०

०२०-२५६२२६९२


रासेयो/२०२०-२१/२५१ दि. १२/०७/२०२१

प्रति,

मा. प्राचार्य/संचालक

रासेयो संलग्नित व स्वायत्त महाविद्यालये व परिसंस्था,

पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा

**विषय : महाविद्यालयांमध्ये निवडणूक साक्षरता मंडळ अनिवार्यपणे स्थापन करणेबाबत**

**संदर्भ** : RB/Gen-2021-CR-220/EDN-4/687, Date : 07 July 2021

महोदय,

माननीय राज्यपाल महोदय कार्यालय, महाराष्ट्र राज्य यांनी सूचित केल्यानुसार भारत निवडणूक आयोगाचा **स्वीप- मतदारांचे पद्धतशीत शिक्षण व सहभाग (SVEEP-Systematic Voter Education and Electoral Participation)** हा एक महत्त्वाचा प्रकल्प आहे. या प्रकल्पांतर्गत मतदार नोंदणी, मतदानाच्या टक्केवारीत वाढ आणि लोकशाही सक्षमीकरणासाठी सामान्यपूर्ण उपक्रम यावर भर देण्यात आला आहे.

मुख्य निवडणूक आयोग, भारत सरकार यांच्या राज्य प्रतिनिधींशी समन्वय साधून ह्या अनुषंगाने विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालये/परिसंस्थांमध्ये **स्वीप** उपक्रमाची अंमलबजावणी करणे अभिप्रेत आहे. महाराष्ट्र राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी किंवा त्यांचे प्रतिनिधी आणि विद्यापीठ यांच्यांशी चर्चा करून महाविद्यालये व परिसंस्थांच्या स्तरावरील **स्वीप** उपक्रमाचे वार्षिक वेळापत्रक तयार करून ते आयोजित करण्याची जबाबदारी सोपवण्यात आलेली आहे. याबाबत विद्यापीठ व रासेयो विभाग प्रशासनाकडून आपणास उचित सहकार्य मिळेल.

विद्यार्थ्यांमध्ये लोकशाही जागृती करण्यासाठी **निवडणूक साक्षरता मंडळ** स्थापन करून विद्यार्थ्यांसाठी वेबसंवाद, परिसंवाद, लोकशाही-दिनदर्शिका, लोकशाही-विचारपुस्तिका, दूरदृश्यप्रणाली स्पर्धा, राज्य स्पर्धा महोत्सव, विशेष दिनांचे आयोजन (राष्ट्रीय मतदार दिन, महिला दिन, युवा दिन, अपंग दिन, तृतीय पंथीय ओळख दिन) हे उपक्रम हाती घेता येतील.

तरी आपल्या महाविद्यालय व परिसंस्थांमध्ये निवडणूक साक्षरता मंडळ स्थापन करून याबाबतचा अहवाल आणि उपक्रम नियोजनाचा आराखडा तात्काळ तसेच वर्षभरातील उपक्रमांचे कार्यवृत्तांत वेळोवेळी मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय यांना ceo_maharashtra@eci.gov.in व राष्ट्रीय सेवा योजना कार्यालयाला nss_student_list@pun.unipune.ac.in या मेल आयडीवर निवडणूक साक्षरता मंडळ या विषयासह पाठवण्यात यावी. कळावे, ही विनंती.

**संचालक**

**राष्ट्रीय सेवा योजना**

RB/Gen-2021/CR-220/EDN-4/687

**RAJ BHAVAN**
MALABAR HILL
MUMBAI 400 035

SECRETARY TO THE GOVERNOR MAHARASHTRA

7th July 2021

Subject : Regarding establishment of the "Electoral Literacy Club" in all the State Universities/Colleges of Maharashtra under SVEEP Program of ECI.

**Dear Dr.**

I enclose herewith a copy of the letter dated 30th June 2021, received by the Chancellor from the Principal Secretary and Chief Electoral Officer, Maharashtra State, on the subject mentioned above.

Election Commission of India has initiated a programme called "SVEEP" (Systematic Voter Education and Electoral Participation) to create awareness among eligible voter for strengthening Democratic Process. Various activities can be organised at University level in consultation with state representative of Election Commission of India. Chief Electoral Officer of State of Maharashtra or his representative may contact you to take this forward, help prepare annual calendar of events, provide hand holding support as well as organizing various SVEEP related programme at university level as well as College level. I hope you will provide all necessary help to make it successful.

Action taken report in this regard may be communicated for perusal of Hon'ble Chancellor.

**With best wishes,**

Yours,

**(Santosh Kumar)**

**All the Vice-Chancellors of State Universities.**

1/C

अ.शा. पत्र क्र.:- संकीर्ण-२०२१/प्र.क्र.१७६/२१/३३
सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय
(विस्तार), मदाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई-४०० ०३२.
दिनांक: ३० जून, २०२१.

महाराष्ट्र शासन


**श्रीकांत देशपांडे**
**प्रधान सचिव तथा मुख्य निवडणूक अधिकारी,**
**महाराष्ट्र राज्य**



राज्यपालांचे सचिवालय
NIC Receipt
02/07/2021
4781135


**विषय:- महाराष्ट्रातील सर्व कृषी आणि अकृषी विद्यापीठांमध्ये निवडणूक साक्षरता मंडळ अनिवार्यपणे स्थापन करण्याबाबत.**

महोदय,

महाराष्ट्र राज्याचा मुख्य निवडणूक अधिकारी म्हणून आपल्याशी संपर्क साधताना मला अत्यंत आनंद होत आहे. भारत निवडणूक आयोगाचा 'स्वीप - मतदाराचे पद्धतशीर शिक्षण व सहभाग' (SVEEP - Systematic Voter Education and Electoral Participation) हा एक महत्त्वाचा प्रकल्प आहे. या प्रकल्पांतर्गत मतदार नोंदणी, मतदानाच्या टक्केवारीत वृद्धी आणि लोकशाही सक्षमीकरणासाठी सातत्यपूर्ण उपक्रम यांवर भर दिला जातो. महाराष्ट्र राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी बहुआयामी आणि महत्त्वाकांक्षी उपक्रम हाती घेतले आहेत. त्यामध्ये निवडणूक अधिकाऱ्यांसाठी कार्यशाळा, सर्वोत्कृष्ट मतदार नोंदणी कार्यालय पुरस्कार, ई-त्रैमासिक, विविध प्रसारमाध्यमांशी आणि समाजमाध्यमांशी संलग्न उपक्रम इ. उपक्रमांचा समावेश आहे.

सदर उपक्रमांबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये लोकशाही जागरूकता निर्माण करण्यासाठी निवडणूक साक्षरता मंडळ हे एक महत्त्वाचे व्यासपीठ आहे. या व्यासपीठांतर्गत विद्यार्थ्यांसाठी विविध प्रकारचे उपक्रम हाती घेणे अपेक्षित आहे. मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने यंदा विद्यार्थ्यांसाठी वेबसंवाद, परिसंवाद, लोकशाही-दिनदर्शिका, लोकशाही-विचारपुस्तिका, ऑनलाइन स्पर्धा, राज्य स्पर्धा महोत्सव, विशेष दिनांचे आयोजन (राष्ट्रीय मतदार दिन, महिला दिन, युवा दिन, अपंग दिन, तृतीय पंथीय ओळख दिन) हे उपक्रम हाती घेतले आहेत. ही निवडणूक साक्षरता मंडळे महाराष्ट्रातील सर्व कृषी व अकृषी विद्यापीठांनी त्यांच्याशी संलग्न असलेल्या सर्व महाविद्यालयांमध्ये स्थापन करावीत, अशी भारत निवडणूक आयोगाची भूमिका आहे. कुलपती म्हणून आपण सर्व विद्यापीठांच्या कुलगुरूंना आणि त्यांच्या मार्फत सर्व महाविद्यालयांना आपापल्या आस्थापनेवर निवडणूक साक्षरता मंडळाची अनिवार्यपणे स्थापना करण्याबाबत; आणि तशी स्थापना झाल्याचे मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयास ceo_maharashtra@eci.gov.in या ईमेलवर कळवण्याबाबत आपण सूचना दिल्यास, या कार्याला अधिक गती येऊ शकेल

२०२१-२२ या शैक्षणिक वर्षात निवडणूक साक्षरता मंडळामार्फत घेता येतील असे उपक्रम आणि मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय घेणार असलेल्या कोणत्या उपक्रमांशी निवडणूक साक्षरता मंडळाला जोडून घेता येईल, याचा तपशील सोबत जोडला आहे. सध्याची कोरोना संक्रमणाची परिस्थिती लक्षात घेता, निवडणूक साक्षरता मंडळाची स्थापना कशा प्रकारे करता येईल, याविषयीची प्रक्रियाही त्यात अंतर्भूत आहे.

'स्वीप' प्रकल्पासंदर्भात अधिक चर्चा करण्यासाठी मी आपली भेट घेऊ इच्छितो. कृपया, भेटीची वेळ मिळावी ही विनंती!

आपला,

(श्रीकांत देशपांडे)

प्रति,
मा. भगतसिंग कोश्यारिजी,
महामहिम राज्यपाल,
महाराष्ट्र राज्य,
राजभवन,
मुंबई.